

शमीम हुसेन फाउंडेशन यांच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान!

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 17/09/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 219 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# महानगरपालिकेच्या निवडणूक 31 जानेवारीच्या आधी!



>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था अर्थातच महानगरपालिकांच्या निवडणुका ३१ जानेवारीच्या आत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले, राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने मुदत वाढ करणारा अर्ज सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आला होता. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने आदेश देताना ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे, निवडणूक आयोगाला आता ३१ जानेवारीपर्यंत या निवडणुका घ्याव्या लागतील त्यामुळे या निवडणुकीसाठी जे इच्छुक उमेदवार आहेत त्यांनी गाफील न राहता निवडणुकीसाठी कामाला लागावे असे संकेत राजकीय वर्तुळातून देण्यात येत आहे.महाराष्ट्रातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी जानेवारी २०२६ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी करणारा अर्ज राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात सादर केला होता. त्यावर मंगळवारी (१६ सप्टेंबर) सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने राज्य राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. निवडणूक आयोगाला आता ३१ जानेवारीपर्यंत या निवडणुका घ्याव्या लागतील.सर्वोच्च न्यायालयात आज महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांप्रकरणी सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाकडून निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदवाढ मिळाली आहे. यामुळे निवडणूक आयोगासह राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. ही मुदतवाढ मिळावी यासाठी आयोगाने कर्मचाऱ्यांची कमतरता, ईव्हीएमचा मुद्दा, सणसमारंभासह वेगवेगळी कारणं दिली होती. न्यायालयाने आयोगाचे मुद्दे लक्षात घेत त्यांना निवडणुका घेण्यासाठी मुदतवाढ दिली आहे.राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेली चार-पाच वर्षे ओबीसी आरक्षणासह विविध कारणांमुळे लांबणीवर पडल्या होत्या.

सर्वोच्च न्यायालयाने अखेरीस याप्रकरणी मे महिन्यात झालेल्या सुनावणीवेळी निवडणुकांना दिलेली स्थगिती उठविली आणि चार महिन्यांत म्हणजेच ऑक्टोबर २०२६ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले होते. त्यानुसार आयोगाने प्रभागांची पुनर्रचना, आरक्षणे, मतदारयाद्या अद्यायावत करणे, आदी प्रक्रिया सुरू केली आहे.

मात्र, कर्मचाऱ्यांच्या कमतरतेसह इतर काही कारणे पुढे करत निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी मुदतवाढ मागितली होती. न्यायालयाने ही मागणी मान्य केली आहे.

# राज्यस्तरीय 'सेवा पंधरावडा' उपक्रमाची सुरुवात पुण्यात होणार




>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : राज्याच्या महसूल आणि वन विभागामार्फत येत्या बुधवारपासून (१७ सप्टेंबर) सेवा पंधरवडा अभियान राबविण्यात येणार असून, त्याचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुण्यातून होणार आहे.

या सेवा पंधरावड्यात महसूल विभागामार्फत अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत निधीचे वितरण, प्रलंबित फेरफार नोंदीचा निपटारा, नानॅ-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, मतदार नोंदणी, आधारकार्ड सुविधा दिल्या जाणार आहेत. येत्या दोन ऑक्टोबरपर्यंत हा उपक्रम सुरू राहणार आहे.या अभियानाचा उद्घाटन समारंभ गणेश कला क्रीडा रंगमंच येथे होणार आहे.

महसूल, ग्रामविकास, नगररचना, आरोग्य, ऊर्जा, सामाजिक न्याय, महिला आणि बालकल्याण तसेच आदिवासी विभागाच्या विविध सेवा नागरिकांच्या दारात पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या उपक्रमासाठी युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत.

सेवा पंधरावड्यात महसूल विभागामार्फत अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत निधीचे वितरण, प्रलंबित फेरफार नोंदीचा निपटारा, नाॅन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, मतदार नोंदणी, आधारकार्ड सुविधा दिल्या जाणार आहेत.

ग्रामविकास आणि नगर प्रशासन विभागामार्फत मालमत्ता नोंद, नळजोडणी, विवाह नोंदणी, जन्म-मृत्यू नोंदी आणि प्रमाणपत्र वितरण, मालमत्ता कर आकारणी या सेवा उपलब्ध करून दिल्या जातील.

# शमीम हुसेन फाउंडेशन यांच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान!

## थेरगाव येथील उर्दू शाळेत केला आदर्श शिक्षकांचा सन्मान!

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरात शमीम हुसेन सोशल एज्युकेशन फाउंडेशन वतीने आज थेरगाव येथील यशवंतराव चव्हाण प्राथमिक उर्दू शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा शालेय वस्तू भेट देत सन्मान व आदर्श शिक्षक यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पिंपरी चिंचवड शहराचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे युवक शहराध्यक्ष इमरान भाई शेख यांच्या उपस्थितीत तसेच फाउंडेशनच्या अध्यक्ष शबनम सय्यद यांच्या मार्गदर्शनात सदर कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी अति उत्साहाने नात गात केली तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी आपापले कला गुण दाखवीत आनंदित केले.यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका शाहिदा सय्यद मॅडम यांच्या सहकार्याने बालवाडी तसेच पहिली ते आठवी वर्गातील उत्तीर्ण होऊन प्रथम आणि द्वितीय गुण मिळविणाऱ्या




विद्यार्थ्यांचा यावेळी शालेय वस्तू भेट देत सन्मान करण्यात आला. यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने या शाळेतील शिक्षकांना आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार देण्यात आला होता या निमित्ताने शमीम हुसेन फाउंडेशन वतीने त्यांचा देखील सन्मान सत्कार करण्यात आला. यामध्ये उस्ताद बीबी हाजरा जंग बहादूर व नसरीन बानो मोहम्मद सुलतान या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.यावेळी बोलताना इमरान भाई शेख म्हणाले, गुणवंत विद्यार्थ्यांचा शालेय भेटवस्तू देऊन सन्मान म्हणजे त्यांच्यावर कौतुकाची थाप आहे, अशाच रीतीने विद्यार्थी घडत असतात व त्यांना मार्गदर्शन आणि सहकार्य मिळत असते, लहानपणी सर्वच विद्यार्थी आपापले गुण घडवत असतात यामुळेच भविष्यात देखील त्यांना मदत होते, अशाच रीतीने फाउंडेशनच्या अध्यक्ष शबनम ताई सय्यद यांनी हा उपक्रम राबविला आहे त्यांच्या देखील कार्याचे कौतुक आहे शबनम ताई नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर राहतात तसेच त्यांच्याकडून विविध सामाजिक कामे केली जातात. याच अंतर्गत या विद्यार्थ्यांना शालेय वस्तू भेट देत हा कार्यक्रम अतिशय उत्तम प्रकारे आयोजन केल्याबद्दल त्यांचे आणि सहकाऱ्यांचे कौतुक आहे. याप्रसंगी बोलताना शाळेच्या मुख्याध्यापिका शाहिदा सय्यद म्हणाल्या की, आमच्या शाळेत विविध उपक्रम पार पडतात, विविध कार्यक्रम देखील येथे घेतले जातात. मात्र आजचा कार्यक्रम विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे. यासाठी फाउंडेशनच्या अध्यक्ष शबनम सय्यद यांचे कौतुक आहे. विद्यार्थ्यांना त्यांनी शालेय वस्तू भेट देत त्यांचा केलेला सन्मान यामुळे विद्यार्थी खरोखरच भविष्यात पुढे नक्कीच यश गाठतील आणि या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना मिळालेली कौतुकाची थाप नक्कीच पुढे काम येईल. तसेच शबनम सय्यद यांनी आमच्या शाळेमध्ये आयोजित केल्याबद्दल त्यांचे देखील आभार! याप्रसंगी फाउंडेशनचे संस्थापक रफी हुसेन, सचिव शाहूल हमीद शेख, पदाधिकारी रमजान सय्यद, सहकारी आसिया इनामदार, फरदीन सय्यद, गजाला सय्यद सर्व शिक्षक मंडळी, पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजाला सय्यद यांनी केले तर आभार शबनम सय्यद यांनी व्यक्त केले.

# महापालिका राबवणार ‘स्वच्छता ही सेवा’ अभियान

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी: राष्ट्रपिता महात्मा गांधींनी स्वप्न पाहिलेल्या स्वच्छ भारताच्या ध्येयाकडे वाटचाल करत पिंपरी चिंचवड महापालिकेकडून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान ‘स्वच्छता ही सेवा’ अभियान राबविण्यात येणार आहे. स्वच्छतेला सामाजिक चळवळीचे रूप देणे, नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे आणि शहरी तसेच ग्रामीण भागातील स्वच्छतेत लक्षणीय सुधारणा करणे हा या अभियानाचा उद्देश आहे.महापालिकेने या अभियानांतर्गत १६ दिवसांच्या कालावधीत विविध नाविन्यपूर्ण,




लोकसहभाग वाढवणारे कार्यक्रम आखले असून त्यातून नागरिकांना प्रत्यक्ष कृतीतून सहभागी करून घेण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमांमध्ये नागरिक, व्यापारी वर्ग, स्वयंसेवी संस्था, महिला गट व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

**अभियानातील महत्त्वाचे उपक्रम**

सार्वजनिक जागांची स्वच्छता मोहीम : या मोहीमेत मुख्य रस्ते, बाजारपेठा, बसस्थानके, उद्याने व जलाशय परिसराची स्वच्छता, सफाई मित्रांसाठी आरोग्य तपासणी, सुरक्षा साधनांचे वितरण व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

स्वच्छ हरित महोत्सव : या महोत्सवांतर्गत पर्यावरणपूरक उत्पादने, वृक्षारोपण उपक्रम, हरित जीवनशैलीवरील कार्यशाळा व प्रदर्शन घेण्यात येईल.

प्लास्टिक प्रदूषणविरोधी जागरूकता : या उपक्रमांतर्गत सिंगल-यूज प्लास्टिक टाळण्यासाठी पर्यायी उपाययोजनांची माहिती देण्यात येईल.

घरोघरी जनजागृती : ओला-सुका कचरा वर्गीकरण, घरगुती कंपोस्टिंग, वेस्ट सेग्रीगेशन याविषयी प्रात्यक्षिके व माहितीपत्रके आदींबाबत नागरिकांना माहिती दिली जाईल.

स्वच्छता रॅली : विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट व नागरिकांच्या सहभागातून भव्य रॅलीचे आयोजन करणे.

आर.आर.आर.(Reduce–Reuse–Recycle) जनजागृती : घरातील उपयोगी पण वापरात नसणाऱ्या वस्तू आर.आर.आर. सेंटरमध्ये जमा करण्यासाठी प्रोत्साहन देणे.वेस्ट आर्ट उपक्रम : कचऱ्यातून कलाकृती तयार करून “कचरा हा संसाधन आहे” हा संदेश पोहोचविणे.

# पुणे नवरात्रौ महोत्सवाचे होणार भव्य उद्घाटन!

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : कला, संस्कृती, गायन, वादन, भजन, नृत्य, संगीत यांचा मनोहारी संगम असणारा पुणे नवरात्रौ महोत्सवाचे यंदा ३१वे वर्ष दिमाखात साजरे करीत असून, महोत्सवाचे उद्घाटन सोमवार, दि. २२ सेप्टेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता महाराष्ट्राचे महसूलमंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते श्री. गणेश कला क्रीडा रंगमंच येथे संपन्न होईल. याप्रसंगी केंद्रीय नागरी हवाई उड्डाण व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत व माजी आमदार उल्हास पवार ,राज्याच्या नागरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खा. मेधा कुलकर्णी, आ.डॉ. विश्वजीत कदम, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, पुणे मनपा आयुक्त नवल किशोर राम, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अप्पर पोलीस आयुक्त संजय पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या उद्घाटन सोहळ्यात सिनेतारका भार्गवी चिरमुले, तेजा देवकर, सानिया चौधरी, शितल अहिरराव, राधा सागर, सिया पाटील, ऋजुता जुन्नरकर, अमृता धोंगडे, वैष्णवी पाटील यांची विशेष उपस्थिती लक्षवेधी असेल. या महोत्सवाचे सर्व कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य असतात. अशी माहिती पुणे नवरात्रौ महोत्सवाचे आयोजक अध्यक्ष आबा बागुल यांनी पत्रकार परिषदेत सांगितली. सोमवार दि. २२ सप्टेंबर घटस्थापनेच्या दिवशी शिवदर्शन येथील श्री. लक्ष्मीमाता मंदिरात आबा बागुल व सौ. जयश्री बागुल यांच्या हस्ते सकाळी ६.४१ मि. या शुभमुहूर्तावर विधिवत घटस्थापना केली जाईल. या मंदिरात यंदा माधुराई येथी ७२ फुट उंचीचे मीनाक्षी मंदिर हा भव्य देखावा साकारला जात असून दक्षिणेकडील सुमारे ८० कलावंत या देखाव्याचे काम करीत आहेत. दरवर्षी दिले जाणारे महर्षी – लक्ष्मीमाता जीवनगौरव पुरस्कार या उद्घाटन सोहळ्यात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या महनीय व्यक्तिस दरवर्षी 'महर्षी पुरस्कार' देऊन गौरवले जाते. यंदा भटक्या विमुक्त समाजातील मुलांचे संगोपन शिक्षण व संस्कार यासाठी अविरत काम करणारे समाजसेवक पद्मश्री गिरीश प्रभुणे यांना महर्षी पुरस्काराने सन्मानित केले जाईल. असे आबा बागुल यांनी सांगितले. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रात सातत्याने योगदान देणाऱ्या व्यक्तींना या उद्घाटन सोहळ्यात श्री. लक्ष्मीमाता जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाते. यंदाच्या पुरस्कारचे मानकरी डॉ. पराग काळकर (प्र-कुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सामजिक कार्यकर्त्या डॉ. मेघा पुरव सामंत, बुलढाणा सहकारी बँकेचे सहसंस्थापक शिरीष देशपांडे आणि लोककलावंत प्रमिला लोदगेकर यांना या पुरस्काराने गौरवले जाईल. याशिवाय डॉ. मयूर कर्डिले आणि डॉ. अरविंद खोमणे, यांचेही विशेष सन्मानित करणात येणार आहेत. उद्घाटन सोहळा दरवर्षी प्रमाणे भव्य आणि नेत्रदीपक असेल. यामध्ये सितार, व्हायोलिन, बासरी व तबला यांची जुगलबंदी असणारा 'आनंद तरंग' हा कार्यक्रम डॉ. नीलिमा राडकर आणि माधवी करंदीकर व ग्रुप सादर करतील. नृत्यगुरु पं. शमा भाटे व सहकारी 'शरण्ये रुद्र चंडिके' कथ्थक हा कार्यक्रम सादर करतील. विनोद धोकटे, स्वाती धोकटे व सहकलाकार 'जागर शक्ती पिठांचा' देवीचा गोंधळ हा कार्यक्रम सादर करतील. उद्घाटन सोहळ्याचा आकर्षण ठरणारा मराठी सिनेतारका भार्गवी चिरमुले, तेजा देवकर, सानिया चौधरी, शितल अहिरराव, राधा सागर, सिया पाटील, ऋजुता जुन्नरकर, अमृता धोंगडे, वैष्णवी पाटील या सिनेतारकांचा 'जल्लोष' हा नृत्याविष्कार रसिकांना मंत्रमुग्ध करेल. याचे नृत्यदिग्दर्शन निकिता मोघे यांनी केले आहे. उद्घाटना नंतर पुण्यातील एकमेव सलग ११ दिवस विजयादशमीपर्यंत रोज सायंकाळी ७ वाजता श्री. गणेश कला क्रीडा रंगमंच येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर होतील. मंगळवार दि. २३ रोजी १९९०च्या काळातील सुरेल गाण्यांचा 'नाईनटीज मेलडी' हा कार्यक्रम अभिजित सराफ, कल्याणी देशपांडे आणि अक्षय घाणेकर सादर करतील. बुधवार दि. २४ रोजी 'इश्क सुफियाना' कार्यक्रम संदीप पंचवाटकर, प्रवीण अवचर, संदीप उबाळे आणि विनल देशमुख सादर करतील.

# शहरात नव्या 5 पोलिस ठाण्यांना मंजुरी

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : शहराचा विस्तार वाढत असून, पुणे ही 'फ्युचर सिटी' आहे. आयटी, उद्योग, शिक्षणासह विविध क्षेत्रात आघाडीवर असलेल्या या शहराची वाढ विचारात घेऊन पुढील दहा वर्षांत मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. शहरातील कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न सोडवण्यासाठी पुणे शहरासाठी आणखी पाच पोलिस ठाण्यांना मंजुरी देण्यात येणार आहे.याशिवाय अतिरिक्त एक हजार पोलिस कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ८ ऑगस्ट रोजी शहरात केली होती. त्यानुसार सोमवारी (दि.१५) गृहविभागासह वित्त विभागाकडून शहरात नव्या ५ पोलिस ठाण्यांसह २ स्वतंत्र झोन (पोलिस उपायुक्त) ला देखील मान्यता देण्यात आली.नव्या पोलिस ठाण्यांसाठी ८३० मनुष्यबळ देखील मंजुर करण्यात आल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. नवीन पोलिस ठाण्यांच्या निर्मितीसाठी पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.राज्याच्या आजवरच्या इतिहासात इतर आयुक्तालयाच्या तुलनेत अवघ्या एक वर्षाच्या आतमध्ये तब्बल १२ पोलिस ठाण्यांच्या निर्मितीसह दोन झोन मंजूर झालेले पुणे पोलिस आयुक्तालय अव्वल ठरले आहे. पहिल्या टप्प्यात थेट ७ पोलिस ठाण्यांना मंजुरी मिळवण्यासाठी प्रचंड मेहनत फळाला आली. त्याठिकाणी काम करण्यासाठी शासनाने ८१६ पदांची मान्यता दिली होती.

त्यानंतर आता पाच पोलिस ठाण्यांच्या निर्मितीला गृह व वित्त विभागाने हिरवा कंदील दिला असल्यामुळे नव्याने ८३० मनुष्यबळ उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर आयुक्त संजय पाटील, डिसीपी राजलक्ष्मी शिवणकर आणि एसीपी विवेक पवार यांनी वेळोवेळी शासनाने पाठपुरावा केला.

# भाषा आपल्या संस्कृतीचा, परंपरांचा आणि आपल्या ओळखीचा आत्मा- इम्रान शेख

## महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी येथे हिंदी दिवस उत्साहपूर्वक संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी येथे हिंदी दिवस संपन्न झाला .या प्रसंगी हिंदी भाषेचे महत्त्व,गौरव आणि साहित्यिक परंपरा यावर प्रकाश टाकत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून झाली. त्यानंतरमहाविद्यालयाच्या उपप्राचार्य व हिंदी विभागप्रमुख प्रो. (डॉ.) कामायनी सुर्वे यांनी प्रास्ताविक केले.समारंभाचे प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध साहित्यिक व अनुवादक, स.प.महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख प्रो. (डॉ.) गोरख थोरात होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात 'हिंदीतील रोजगाराच्या संधी'या विषयावर विचार मांडले. भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नसून व्यक्तीच्या अभिव्यक्तीचे साधन आहे, असे सांगून त्यांनी हिंदीमध्ये उपलब्ध असलेल्या सरकारी व बिगर-सरकारी रोजगाराच्या संधींवर



सविस्तर चर्चा केली. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले – "करण्यानेच होते, आधी करायला हवे". म्हणूनच आपला कल ओळखून रोजगाराच्या क्षेत्रात उतरावे, असा संदेश त्यांनी दिला.यानंतर युवक शहर अध्यक्ष व हिंदी विभागाचे माजी विद्यार्थी इम्रान भाई शेख यांनी भाषण केले. त्यांनी "भाषा ही केवळ बोलण्याचे किंवा लिहिण्याचे साधन नाही तर ती आपल्या संस्कृतीचा, आपल्या परंपरांचा आणि आपल्या ओळखीचा आत्मा आहे" हे अधोरेखित केले व समाजात हिंदी भाषेचे महत्त्व स्पष्ट केले.सध्याच्या Gen-z पिढीच्या आवडीनिवडी,तसेच सोशल मीडियाच्या युगात रील्स,सिनेमा आणि युट्यूबच्या माध्यमातून हिंदीचा प्रसार कसा होत आहे,यावर त्यांनी प्रकाश टाकला.यानंतर महाविद्यालयाच्या माजी हिंदी विभाग प्रमुख प्रा. अलका चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून "कामाविषयी निष्ठा आणि जिद्दीमुळेच यश मिळते" असे सांगून संघर्षाबद्दल सजग केले आणि महाविद्यालयातील सुवर्णक्षणांची आठवण करून दिली.यानंतर डॉ.प्रमोद परदेशी , डॉ. वैशाली खेडकर व डॉ.अलका घोडके यांनी संपादित केलेले पुस्तक 'आधुनिक हिंदी साहित्य में पर्यावरण चेतना' प्रकाशित करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रो . (डॉ.) पांडुरंग भोसले यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात स्वतःला सिद्ध करण्यासाठी विविध यशस्वी विद्यार्थ्यांची उदाहरणे देत प्रेरणा दिली.हिंदी दिवसाच्या निमित्ताने हिंदी विभागाने महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांमध्ये विजयी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यातआला

हिंदी काव्यवाचन स्पर्धा : मुस्कान इब्राहिम गोलंदाज – प्रथम, सुमय्या महेमूद सय्यद – द्वितीय, श्रुति साईनाथ वाकडे – तृतीय.

हिंदी वक्तृत्व स्पर्धा : मुस्कान इब्राहिम गोलंदाज – प्रथम, पल्लवी राम लाड – द्वितीय, साक्षी काळूराम मस्के – तृतीय, तर आशिक रविंद्र शिरसाट आणि संजोग सुरेश मस्के – उत्तेजनार्थ.

हिंदी निबंध स्पर्धा : श्रावणी पांडुरंग फुलझळके – प्रथम, अंकित लक्ष्मण मुजमुले – द्वितीय, सुमैया महमूद सय्यद – तृतीय, तर शिवानी संगम तिवारी – उत्तेजनार्थ.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाची विद्यार्थिनी सुमय्या सय्यद हिने केले, तर आभार प्रदर्शन स. प्रा. मंगेश वाडेकर यांनी केले. संपूर्ण समारंभ सौहार्द, उत्साह आणि हिंदी भाषेबद्दलच्या आस्थेच्या वातावरणात संपन्न झाला.

# महानगरपालिका 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियान राबविण्यास सज्ज

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : महिलांचे आरोग्य व सक्षमीकरण हे कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीचे प्रमुख केंद्रस्थान आहे. याच उद्देशाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार मार्फत "स्वस्थ नारी, सशक्त परिवार" हे विशेष राष्ट्रीय अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे.या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ इंदौर, मध्य प्रदेश येथे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते होणार असून या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण देशभरातील प्रमुख ठिकाणी करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील राज्यस्तरीय




शुभारंभ सोहळा दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यभर होणार असून राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सेंटर, रंगस्वर सभागृह नरिमन पॉईंट येथे मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. आरोग्यमंत्री, मा. राज्यमंत्री आणि मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. राज्यभरात त्याच दिवशी प्रत्येक जिल्हा व महापालिका स्तरावर महिला व बालकांसाठी विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत.या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालये व दवाखान्यात विविध आरोग्य शिबिरे, तपासण्या आणि जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असून, नागरिकांना या सर्व सेवांचा व्यापक लाभ मिळावा यासाठी वैद्यकीय विभागाच्या वतीने विशेष नियोजन केले आहे.

सदर अभियानाचा शुभारंभ महानगरपालिके मार्फत सन्माननीय लोक सभा सदस्य, विधानपरिषद सदस्य, विधानसभा सदस्य तसेच आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्या हस्ते तालेरा रुग्णालय, कै. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, नवीन भोसरी रुग्णालय व कै. ह.भ.प. मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालय, आकुर्डी येथे करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सदरची शिबिरे महानगरपालिकेच्या आठही रुग्णालयात तसेच ३१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात व नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र येथे दैनंदिन (१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत) आयोजित करण्यात आलेली आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत सर्व महिलांना आवाहन करण्यात येते कि, सदर शिबिरातील विविध सेवांचा लाभ घ्यावा.